जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३२९ दिनांक - ०५/०५/२०२३**

# युनिट ०१ गुन्हे शाखा,पुणे शहर

## जबरी चोरी करुन,नागरीकांचे मोबाईल हिसकावणारे जेरबंद

दिनांक ०४/०५/२०२३ रोजी युनिट ०१ कडील **पोलीस अंमलदार अभिनव लडकत** यांना बातमी मिळाली की, मोबाईल मार्केट फरासखाना पोलीस स्टेशन समोर बुधवार पेठ पुणे येथे काही इसम नंबर नसलेल्या पांढ-या रंगाच्या अॅक्टीवा गाडीवरुन मोबाईल विक्री करिता येणार असुन त्यांचेकडील मोबाईल हे चोरीचे आहेत. सदरची बातमी युनिट-१ चे प्रभारी अधिकारी वपोनि श्री क्रांतिकुमार पाटील युनिट-२ गुन्हे शाखा (अति. कार्यभार) पुणे यांना कळविली असता त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे युनिट १ कडील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी सापळा रचुन दोन इसमांस व एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले असता त्यांच्याकडुन एकुण ६ मोबाईल व चोरी करताना वापरलेली १ मोपेड अॅक्टिव्हा मोटर सायकल असा एकुण १,५३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

त्यानंतर त्यांचे नाव व पत्ते विचारले असता त्यांनी त्यांची नावे - **१) अदित्य प्रशांत साळवे वय – १९ वर्षे रा. स. नं. २५, राजेन्द्र प्रसाद शाळेचे पाठीमागे, जयविजय चौक, बोपोडी पुणे २) सचिन अशोक केंगार वय १९ वर्षे रा कमळाबाई बहिरट चौक, सम्राट नगर, बोपोडी पुणे (अटक) व विधीसंघर्षित बालक (ताब्यात) असे सांगितली.** त्यांचेकड अधिक तपास करता सदर आरोपी हे पहाटेचे वेळी बाहेरगावाहुन येणारे प्रवाशी लोक हे रस्त्याने एकटे पायी जात असताना त्यांचे पाठीमागुन येवुन त्यांचे हातातील मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेवुन दुचाकीवरुन पसार होत होते.

आरोपी व **विधीसंघर्षित बालक** यांना विश्वासात घेवुन तपास केला असता त्यांनी खालील पोलीस स्टेशन कडील गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

१) शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं. – ७९/२०२३, भा.द.वि. – ३९२,३४
२) शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं. – ९३/२०२३, भा.द.वि. – ३९२,३४
३) शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं. – ९४/२०२३, भा.द.वि. – ३९२,३४
४) खडक पोलीस स्टेशन गु.रजि.नं. – १३८/२०२३, भा.द.वि. – ३९२,३४
५) विश्रामबाग पोलीस स्टेशन गु.रजि.नं. – ९२/२०२३, भा.द.वि. – ३९२,३४
६) मुंढवा पोलीस स्टेशन गु.रजि.नं. – १४८/२०२३, भा.द.वि. – ३९२,३४

पुढील तपासकामी सदर इसमांना खडक पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री संदिप कर्णिक मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री रामनाथ पोकळे मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर,श्री अमोल झेंडे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री सुनिल पवार, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील,(अति.कार्य – युनिट ०१) सपोनि. कवठेकर, पोलीस उप निरीक्षक सुनिल कुलकर्णी, श्रेणी पो.उप. तापकीर, श्रेणी पो.उप.नि. जाधव, सपोफौ.राहुल मखरे, पो.अंमलदार. अभिनव लडकत, अनिकेत बाबर, शशिकांत दरेकर, दत्ता सोनावणे, निलेश साबळे, अमोल पवार, अय्याज दड्डीकर, विठ्ठल साळुंखे शुभम देसाई, रुक्साना नदाफ, तुषार माळवदकर यांनी केली आहे.